Maharashtra Political Science and Public Administration Conference
Reg.No. MAH / 12-83 / Aurangabad F - 985

Volume - II No. :3 Sept.2015 ISSN No. 2347-9639

# VICHAR MANTHAN

National Research Journal of Political Science and Public Administration
(Peer Reviewed Journal)

## The Relevance of Phule-Shahu-Ambedkar Thought



महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन
परिषदेची संशोधन पत्रिका

# विचार मंथन

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. पी.डी. देवरे
सहसंपादक : प्रा. मनोहर पाटील | संपादक : डॉ. प्रमोद पवार

अथर्व पब्लिकेशन्स

Scanned with CamScanner

S, 107 ते 14

महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेची संशोधन पत्रिका

# विचार मंथन

## National Research Journal of Political Science and Public Administration

(A Peer Reviewed Journal)

Volume - 2 | Number - 3 | Sept.- Dec. 2015

♦ Chief Editor ♦
Prin. Dr. P. D. Deore (Nasik)

♦ Asst.Editor ♦
Vice Prin. Manohar Patil (Dhule)

♦ Editor ♦
Prin. Dr. Pramod Pawar (Amalner)

♦ Advisory Editors ♦
Dr. Vitthal More (Latur)
Dr. Vasanti Rasam (Kohlapur)
Dr. Alka Deshmukh (Nagpur)
Dr. Sikandar Jamadar (Panhala)
Dr. Pyarelal Suryawanshi (Amravati)
Dr. Ajay Chandrakar (Raipur)
Dr. Garima Jawualkar (Bhopal)
Dr. Surendra Jondhale (Mumbai)
Dr. Bharati Patil (Kolhapur)
Dr. Ashok Naikwade (Aurangabad)
Dr. Ketan Govekar (Panji, Goa)
Dr. Jyostna Sonkhaskar (Tryambkeshwar)
Dr. Bal Kamble (Karjat)
Dr. SunilKumar Goyal (Khandwa)

♦ Editing Assists ♦
Asst. Prof. Liladhar Patil (Amalner)
Dr. Sambhaji Patil (Shindkheda)
Asst. Prof. Viquar Shaikh (Jalgaon)
Asst. Prof. Ramesh Pawara (Amalner)
Asst. Prof. Mahadev Tonde (Amalner)

♦ Managing Editor ♦
Mr. Yuvraj Mali

♦ Publishers ♦
Atharva Publications
Basement, Om Hospital, Near Anglo Urdu Highschool, Dhake Colony, Jalgaon - 425001 Ph.No. 0257-2239666

: Corresponds Address :

Prin. Dr. P. D. Deore
11, Shri Samarth Appartment, Chitrangan Soc., Savarkar Nagar, Gangapur Road, Nashik-13 Mob : 9423980457

Vice Prin. Manohar Patil
S.S.V.P.S College, Dhule
Email-manoharpatil123@gmail.com Mob : 9422287053

Prin. Dr Pramod Pawar
Dhandai Arts College, Amalner Dist. Jalgaon
Email- pramodpawar1761@gmail.com Mob : 9423582073

Maharashtra Political Science and Public Administration Conference
Reg. No. MAH/12-83/ Aurangabad-F-985

Visit Us : www.mpspac.com
E-Mail : vicharmanthanjournal@gmail.com

Subscription

Individuals : Rs. 1000/- For Five Years
Institutions : Rs. 1500/- For Five Years
Singal Issue Price Rs.100/

विचारमंथन या अर्धवार्षिकात प्रसिद्ध झालेली मते संपादक, सहसंपादक, कार्यकारी संपादक आणि सल्लागार मंडळ यांना मान्य असतीलच असे नाही. या नियतकालिकात प्रसिद्ध करण्यात आलेल्या लेखातील लेखकांची मते ही त्यांची वैयक्तिक मते आहेत. तसेच शोधनिबंधाची जबाबदारी ज्या-त्या लेखकांवर राहिल.

मेसर्स अथर्व पब्लिकेशन्सच्यावतीने कार्यकारी संपादक श्री.युवराज माळी यांनी प्लॉट नं.१७, देविदास कॉलनी, धुळे-४२४ ००१. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले व आविष्कार प्रिंटर्स, अयोध्यानगर, जळगाव येथे मुद्रित केले. मोबाईल : ९४०५२०६२३०, फोन : ०२५७-२२३९६६६.

Scanned with CamScanner

- महात्मा जोतीराव फुले यांच्या शिक्षण विषयक .... १०४
  विचारांचा समाजावरील प्रभाव एक अभ्यास
  – प्रा. के. एम. भालके, चौसाळा
  – श्री. एस. के. भालके, चौसाळा
- मधुकरराव चौधरी यांच्या राजकीय व .............. १०७
  सामाजिक कार्यात फुले, शाहु, आंबेडकरी
  समतावादी दृष्टीकोन
  – संजय वामनराव भोळे, शेंदुर्णी
  – प्रा. डॉ. के. जी. पोकळे, चौसाळा
- आंबेडकरी विचारधारेचा भारतीय .................. १११
  राजकारणावरील प्रभाव
  – डॉ. शोभा टी. चौधरी, भुसावळ
- फुले–शाहू–आंबेडकरी विचारधारेचा स्त्रीवादी ...... ११५
  विचारांवर पडलेला प्रभाव
  – प्रा. मिलिंदकुमार भिकाजी देवरे, म्हसदी
- शिक्षण व अभ्यासक्रमातून प्रकट होणारा .......... ११८
  फुले–शाहू–आंबेडकरी विचार
  – अभिषेक गायकवाड, जळगाव
- फुले–शाहु–आंबेडकर विचारांचा भारतीय.......... १२१
  राजकारणावरील परिणाम
  – प्रा. नितीन जाधव, निफाड
  – प्रा. डॉ. सुरेंद्र अंबर मोरे, धुळे
- सामाजिक न्याय आणि बदलती सामाजिक ........ १२४
  व्यवस्था
  – अर्चना ज्ञा. पाटील, अकोला
- महात्मा फुले यांच्या मानवी हक्कविषयक .......... १२६
  विचारांची प्रासंगिकता
  – प्रा. डॉ. संदीप भि. काळे, सेलू
- फुले, शाहू, आंबेडकरी विचारधारेचा स्त्रीवादी ..... १२८
  विचारावर पडलेला प्रभाव
  – प्रा. सौ. कांबळे एस. एस., हणेगाव
- महात्मा ज्योतीबा फुले यांचा शाहु–आंबेडकर...... १३१
  विचारधारेवर पडलेला प्रभाव
  – डॉ. विनायक कोडापे, कारंजा लाड
- जागतिकीकरणात फुले–शाहू–आंबेडकरी .......... १३४
  विचारधारेची दिशा व स्वरूप
  – प्रा. महेंद्र पाटील, शिरपूर
- महात्मा जोतीराव फुले – समाजप्रेरक विचारवंत ... १३८
  – डॉ. संभाजी संतोष पाटील, शिंदखेडा
- संसदीय लोकशाही संबंधी डॉ. बाबासाहेब ........ १४१
  आंबेडकरांच्या विचाराचे चिकित्सक अध्ययन
  – प्रा. श्रीमती किरण रविंद्र पवार, जळगाव
  – प्रा. शैलजा तायडे, जळगाव
- स्त्रीयांच्या उध्दारासाठी म.फुले, .................... १४३
  छ. शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब
  आंबेडकरांचे योगदान
  – प्रा. अनिल काशिनाथ साळुंके, शहादा
- फुले, शाहु, आंबेडकरांच्या प्रबोधनवादी .......... १४७
  विचारधारेचा भारतीय संविधानावरील प्रभाव
  – प्रा. सुनिल एन. संदानशिव, दहिवेल
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा ....... १५०
  दलित साहित्य आणि राजकारणावरील प्रभाव
  – प्रा. डॉ. आनंदा बाबुराव सोनवणे, नवलनगर
- जातीसंस्थेचे निर्मुलन : डॉ. बी. आर. ............. १५६
  आंबेडकरांच्या विचाराची प्रासंगिकता
  – डॉ. सत्यपाल हरिभाऊ कांबळे, औरंगाबाद
  – प्रा. शरद बाबुराव सोनवणे, साक्री
- छत्रपती शाहू महाराज यांचे सामाजिक क्रांती– ..... १५९
  विषयी विचार
  – प्रा. कांतीलाल डी. सोनवणे, निजामपुर–जैताणे
- सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीतील ............ १६१
  म.फुलेंचे योगदान
  – प्रा. दिलीप विठ्ठल वाघ, नंदुरबार
  – प्रा. दत्तू लक्ष्मण टाकोळे, नंदुरबार
- फुले –शाहू–आंबेडकर प्रणीत .................... १६३
  जाती अंताचा विचार
  – प्रा. विनय खेमा वाघ, दोंडाईचा
- डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा.......... १६६
  भारतीय राजकारणावरील प्रभाव
  – प्रा. माधव केरबा वाघमारे, मारवड
- फुले–आंबेडकर विचारांची प्रासंगिकता ............ १६९
  – प्रा. डॉ. प्रिया भा. बोचे, सिंदखेडराजा
- डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संसदीय ........... १७१
  लोकशाही संबंधीच्या विचारांची प्रासंगिकता
  – प्रा. अरूण पं. धनवटे, अमरावती
- आंबेडकरी राजकारणाच्या विश्लेषणाची ........... १७४
  मूलतत्वे
  – डॉ. वामन गवई, अमरावती




Scanned with CamScanner

# मधुकरराव चौधरी यांच्या राजकीय व सामाजिक कार्यात फुले, शाहु, आंबेडकरी समतावादी दृष्टीकोन

– संजय वामनराव भोळे
सहा. प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, आ. र. भा. गरूड कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शेंदुर्णी, ता. जामनेर, जि. जळगाव
– प्रा. डॉ. के. जी. पोकळे
राज्यशास्त्र विभाग, नवगण शिक्षण संस्था, राजुरीचे कला व विज्ञान महाविद्यालय, चौसाळा, ता. जि. बीड

## प्रस्तावना

महाराष्ट्रातील विविध चळवळी आणि त्या चळवळीच्या माध्यमातून समाजव्यवस्थेतील पुरोगामी बदल घडविण्याचे उत्तम कार्य फुले,शाहु व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केले आणि महाराष्ट्रातील तळागाळातील उपेक्षित समाजाला न्याय मिळवुन दिला म्हणून आज महाराष्ट्रातील ही सर्व उपेक्षीत जनता व समाज आज महात्मा फुले,राजर्षी शाहु महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मरण केल्याशिवाय राहत नाही.कारण स्वातंत्र्यानंतरच्या आजपर्यंतच्या काळात सर्वसामान्य लोकांवर होणारा अन्याय आजही फारसा थांबलेला दिसत नाही. तेव्हा खरी गरज दिसून येते ती महात्मा फुले,राजर्षी शाहु महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या समतावादी कृतीशील विचारांची परंतु या समतावादी विचारांच्या अभावामुळे महाराष्ट्रातील जनता आज मोठया प्रमाणावर सर्वच पातळीवर उपेक्षीत राहुन विकासापासून वंचीत झाल्याची दिसते. म्हणून राजकीय,सामाजिक,शैक्षणीक,सांस्कृतीक इ. पातळीवर कृतीशील कार्य करणाऱ्या व सामाजिक विकासाचे ध्येय डोळयासमोर असणाऱ्या नेत्याची गरज आज समाजाला असल्याचे स्पष्टपणे दिसते. याच अनुषंगाने स्वातंत्र्यपुर्व काळापासुन मधुकरराव चौधरी यांनी सामाजिक पातळीवर केलेल्या कार्याचा सविस्तर आढावा प्रस्तुत शोध निबंधात घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणात तब्बल २६ वर्ष सत्तेच्या पटलावर राहुन कामकरतांना मधुकरराव चौधरी यांनी महात्मा गांधी,विनोबा भावे, सानेगुरुजी यांना स्मरण करुन, महात्मा फुले, राजर्षी शाहु महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक कल्याणाच्या विचाराला स्मरुन ठेवुन समाज कल्याणाचे भरीव कार्य केलेले दिसते. म्हणूनच महाराष्ट्रातील जनता मधुकरराव चौधरी यांना लोकसेवक या नावाने ही संबोधतांना दिसून येते. यावन मधुकरराव चौधरी यांच्या सामाजिक कार्यात फुले, शाहु, आंबेडकर यांचा खरा समतावादी दृष्टीकोन दिसून येतो. त्या अनुषंगाने प्रस्तुत शोधनिबंधात मधुकरराव चौधरी यांच्या सामाजिक कार्याचा सविस्तर आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

## शोधनिबंधाची उद्दीष्टे

१. मधुकरराव चौधरी यांच्या कार्यातील फुले, शाहु व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा समतावादी दृष्टीकोन स्पष्ट करणे.
२. मधुकरराव चौधरी यांच्या सामाजिक कार्याचा आढावा घेणे.
३. मधुकरराव चौधरी यांचे राजकारणातील खरे सामाजिक कार्य स्पष्ट करणे.
४. मधुकरराव चौधरी यांच्या कार्यातील पुरोगामी दृष्टीकोणाचा सामाजिक कार्याच्या भूमीकेतून आढावा घेणे.
५. मधुकरराव चौधरी व फुले, शाहु व आंबेडकर यांच्या विचारांची आधुनिक काळासाठी असलेली महत्वपुर्णता स्पष्ट करणे.

## मधुकरराव चौधरी यांचे समतावादी सामाजिक कार्य

मधुकरराव चौधरी यांनी सामाजिक पातळीवर वयाच्या १४व्या वर्षीपासून राष्ट्रसेवेच्या माध्यमातुन कार्य केले आणि महात्मा गांधीजींची सर्वोदयी संकल्पना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी त्या अनुषंगाने महात्मा फुले, राजर्षी शाहु महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा समतावादी दृष्टीकोण डोळ्यासमोर ठेवुन प्रत्यक्ष कार्य केले.त्याचा सविस्तर उल्लेख पुढील घटकावर्नि संपूर्ण महाराष्ट्राला दिसतो.

## मधुकरराव चौधरी यांच्या राजकीय व सामाजिक कार्याला कौटुंबीक परंपरा

मधुकरराव चौधरी यांच्या सामाजिक कार्याला खरी चालना मिळाली ती त्यांच्या कुटूंबातील वातावरणातुन बालपणापासूनच्या संस्कारातुन. कारण १९३० साली मधुकरराव चौधरी यांचे वडील धनाजीनाना चौधरी यांनी ब्रिटीश सेवेतील नोकरी सोडून देशसेवेसाठी स्वत:ला वाहुन घेतले व राष्ट्रीय आंदोलनात सहभागी होऊन भारतीय स्वातंत्र्य मिळविण्यासाठी प्रयत्न केले. या सर्व वातावरणाचा परिणाम बालवयातच मधुकरराव चौधरी यांच्यावर झाला आणि वयाच्या १४ व्या वर्षी राष्ट्रसेवेचे व्रत घेऊन आयुष्यभर सामाजिक कल्याणाचे कार्य मधुकरराव चौधरी यांनी केले.

मधुकरराव चौधरी यांचा जन्म स्वातंत्र्यलढ्यातील काळात धनाजीनाना रावजी चौधरी व सरस्वतीबाई धनाजी चौधरी या दांपत्याच्या उदरी १६ जून १९२९ रोजी नाशिक येथे झाला. आणि लहानपणापासूनच मधुकरराव चौधरी यांना राष्ट्रसेवेचे संस्कार मिळाले. महात्मा गांधी,आचार्य विनोबाभावे, साने गुरुजी यांच्या सानिध्यात अल्पकाळ का होईना राहता आल्यामुळे मधुकरराव चौधरी यांना राष्ट्रसेवेची व सामाजिक सेवेची गोडी लागली आणि पुढे आयुष्यभर त्यांनी सामाजिक कल्याणासाठी स्वत:ला वाहुन घेतले व त्या दृष्टीने भरीव असे कार्य केले.



Scanned with CamScanner

**राष्ट्रनिष्ठेतून सामाजिक कार्य**

मधुकरराव चौधरी यांनी राष्ट्रसेवेसाठी वाहुन जरी घेतले असले तरी त्यांच्या समोर भारतातील सर्वच पातळीवरील समाज हा उपेक्षित, दुर्लक्षीत व वंचीत होता आणि म्हणूनच १९४८ साली महात्मा गांधीजींच्या मृत्युनंतर महात्मा गांधीजींचे स्मरण करुन मधुकरराव चौधरी यांनी अशी प्रतिज्ञा केली व आयुष्यभर राष्ट्रसेवा तसेच समाज सेवा करीत राहीन आणि हे करतांना महात्मा गांधीजींच्या त्यागमयी विचारांचा वारसा जपेन अशी शपथ वाहुन मधुकरराव चौधरी यांनी सामाजिक कल्याणाचे कार्य केले.

मधुकरराव चौधरींचा जन्म जरी नाशिक येथे झाला असला तरी खिरोदा जि.जळगांव या त्यांच्या मूळगावी रहिवास करुन मधुकरराव चौधरी यांनी महात्मा गांधीजींच्या सर्वोदयी विचारातुन कार्य केले.

**महात्मा गांधीजींच्या प्रेरणेतुन सर्वोदयी कार्य**

१. **सातपुड्यातील आदीवासींसाठी कार्य –** स्वातंत्र्यपुर्व काळात मधुकरराव चौधरी यांचे वडील धनाजी नाना चौधरी यांना सातपुड्यातीलआदिवासींसाठी कार्य करतांना आलेले अपयश व त्यातुन त्यांची झालेली निघृण हत्या हे मधुकरराव चौधरी यांच्या सामाजिक कार्याची प्रेरणाच ठरले. म.गांधीजींच्या विचारानुसार सर्वोदयाचे काम करतांना 'सर्वसमाजाचे कल्याण हेच आमचे ध्यैय' असे मधुकरराव चौधरी यांनी मानले व वडीलांच्या मृत्युनंतर आदिवासी कल्याणाचे राहीलेले अपूर्ण कार्य पार पाडण्यासाठी मधुकरराव चौधरी यांनी कसोसीने प्रयत्न केले.

आदिवासी हा समाजातील इतर विकसीत घटकाच्या परिघाबाहेरील घटक असल्यामुळे त्या समाजाला विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी मधुकरराव चौधरी यांनी १९७१ साली सातपुडा विकास मंडळ निर्माण करुन आदिवासींच्या विकासासाठी प्रयत्न करुन आदिवासींच्या शिक्षणासाची व्यवस्था करुन त्यांना ज्ञानाच्या प्रवाहात आणले. त्यांनी कृषी प्रबोधन शाखा स्थापन करुन शेतकऱ्यांना शेतीसंबधी प्रशिक्षण देण्याची व्यवस्था केली. धान्य, उत्पादन, फळबाग, बागायतीशेती, वनशेती, तेलबिया उत्पादन असे विविध उपक्रम हाती घेऊन मधुकरराव चौधरी यांनी आदिवासींच्या विकासासाठी प्रयत्न केले ले दिसुन येतात व पुढे यातूनच महात्माफुले,राजर्षी शाहु महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असलेला खरा उपेक्षित घटकांचा बऱ्याच प्रमाणात विकास झाल्याचे दिसुन येतो. त्या दृष्टीने मधुकरराव चौधरी यांची आजच्या काळात महत्वपूर्णता दिसते.

२. **मधुकरराव चौधरी यांचा राजकीय सत्तेतील सहभाग व त्यातून सामाजिक कार्य –** मधुकरराव चौधरी यांच्या राजकीय प्रवेशाचा काळ हा महाराष्ट्रराज्य निर्मीती पूर्वीचा म्हणजे १९५४-५५ चा होय. कोणत्याही राजकीय पक्षाचे सदस्यत्व नसतांना केवळ सामाजिक व राष्ट्रसेवेच्या आधारावर मुंबई राज्यामध्ये १९५७ साली पूर्व ... मधील रावेर,एदलाबाद व भुसावळ ह्या ... जिल्ह्यातील जोड मतदार संघातून मधुकरराव चौधरी ... भरघोस मतांनी विजय मिळविला आणि मुंबई रा... राजकारणातील मधुकरराव चौधरी यांच्या प्रवेशा... पुढे महाराष्ट्र राज्याच्या राकारणातील प्रदीर्घ वाटचाल... २१ वर्ष विविध खात्यांची मंत्रीपदे व ५ वर्ष विधा... अध्यक्ष म्हणून मधुकरराव चौधरी यांनी प्रदीर्घ काळ... राहुन सामाजिक कल्याणाचे कार्य केले व सर्व सत्ता ... पातळीवरील समाजातील घटकांच्या हितासाठी ... वापरली व खऱ्या अर्थाने महात्मागांधी,आचार्य वि... भावे,साने गुरुजी यांच्या विचारांचे खरे वारस ... म्हणता येईल.मधुकरराव चौधरी हे शाहु, फुले, आंबे... यांना अभिप्रेत असलेले खरे समाजसेवक होते. हे ... लोकसेवक या नामाभीदानावरुन दिसून येते. ... मधुकरराव चौधरी यांचा समतावादी दृष्टीकोन दिसते.

३. **राजकारणातील समाजकारण –** मधुकरराव चौधरी ... खरी आवड राजकारणाची नव्हती तर त्या माध्यमा... खरी समाज सेवा कशी करता येईल याचाच सात... त्यांनी प्रयत्न केलेला दिसतो.

मधुकरराव चौधरी हे वयाच्या २८ व्या वर्षी ... राज्याचे मंत्री बनले व त्यांनी उर्जा आणि पाटबं... मंत्री,महसूल उपमंत्री, नगरविकास मंत्री, आरोग्य... शिक्षणमंत्री कार्य व नियोजन मंत्री, सांस्कृतीक मंत्री ... विविध खात्यांची सतत २१ वर्ष कामगीरी बजाव... असे असतांना मधुकरराव चौधरी यांनी त्यागमयी भूमि... ठेवुन केवळ सामाजाभिमुख राजकारण केले ... तळागाळातील लोकांचा विकास कसा करता येईल याचा ... प्रयत्न केलेला दिसतो.

१९९० ते १९९४ या काळात महाराष्ट्र... विधानसभा अध्यक्ष म्हणून काम करतांना रावेर जि.ज... या मतदार संघातील लोकप्रतिनीधी म्हणून मधुकरराव चौ... यांनी आरोग्य,शिक्षण, शेती, पाणी, वीज, रस्ते, परि... या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करुन सामाजि... बांधीलकीचे दर्शन त्यांनी घडवुन दिले त्यामुळे खान्देश... जनता आजही त्यांना खरे लोकसेवक म्हणून संबोध... हीच त्यांच्या यशस्वी सामाजिक कार्याची पावती दि...

४. **मधुकरराव चौधरी यांचे जाती अंताचे कार्य –** महाराष्ट्र... इतिहासात सामाजिक कल्याणाच्या उद्देशाने महात्मा... फुले,राजर्षी शाहु महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकर... यांनी सर्वात महत्वाचे योगदान दिले ते जाती अंता... माध्यमातुन जात निर्मुलनाला. याचाच आधार घेऊन म... ही केवळ एकमेव जात आहे. आणि आपण सर्व एका... ईश्वराची लेकरे आहोत असा विचार समाजात पेर...



Scanned with CamScanner

उत्तम कार्य मधुकरराव चौधरी यांनी स्वत:च्या कुटूंबातून केले हे त्यांच्या कृतीशिल विचारातुन दिसते.

मधुकरराव चौधरी यांनी जाती अंताचे कार्य विवाह संस्थेतून सुरू करुनं विवाह संस्थेतील परंपरेला सामाजिक कल्याणाच्या दृष्टीने तिलांजली देण्याचा प्रयत्न केला. हुंडापद्धती,जाचक रुढी नष्ट करुन याबरोबरच आंतरजातीय विवाहाला प्रोत्साहन देणारे मधुकरराव चौधरी केवळ वैचारीक नव्हे तर कृतीशील समाजसेवक होते. हे त्यांच्या बाबतीतील अनेक उदाहरणावरुन दिसते.

मधुकरराव चौधरी हे जातीपातीच्या बंधनाच्या पलीकडे विचार करणारे असल्यामुळे त्यांनी त्यांच्या स्वत:च्या मुलीचा विवाह दादासाहेब रुपवते या बौद्ध व्यक्तीशी स्वत: करुन दिला. यातून त्यांची केवळ विचारांची नव्हे तर कृतीची महानता दिसते.

केवळ दलितच नव्हे तर मुस्लीम, ख्रिश्चन अशा धर्मातील व्यक्तींशी मधुकरराव चौधरी यांनी त्यांच्या घरातील सदस्यांचे विवाह घडवुन आणले यातून त्यांची वैचारीक व्यापकता व त्यांनी केलेले जातीअंताचे कार्य दिसून येते.

५. **धार्मिक ऐक्यातून सामाजिक कल्याणाचे कार्य –** मधुकरराव चौधरी हे माणूस ही केवळ एक जात आहे असे मानणाऱ्यांपैकी होते. म्हणून त्यांनी जात व धर्म यावर बोलतांना नेहमीच जात व धर्म हा घटक मानवतेच्या व सामाजिक कल्याणाच्या आड येता कामा नये याच भुमिकेतून विचार मांडून कृती केल्याची दिसते. यातच खरा फुले शाहु व आंबेडकरी समतावादी दृष्टीकोन दिसून येतो.

महात्मा फुले यांनी जाती निर्मुलनाचे काम ज्या प्रमाणे स्वत:पासून केले व अस्पृश्यांना सन्मानाने जगता यावे यासाठी कसोसीने प्रयत्न केले, तसेच प्रयत्न शाहु व आंबेडकर या महापुरुषांनी देखील केले म्हणूनच त्यांच्या विचाराशी मधुकरराव चौधरी यांचा समतावादी दृष्टीकोन प्रत्यक्ष पातळीवर जुळणारा दिसतो.

६. **उपेक्षितांचे कैवारी मधुकरराव चौधरी –**मधुकरराव चौधरी यांचा मुळपिंड हा सामाजिक सेवेचा असल्यामुळे मानव सेवा हीच खरी ईश्वर सेवा ह्या तत्वाचा अंगीकार करुन त्यांनी संपूर्ण आयुष्यभर उपेक्षित घटकांसाठी काम केले.

महाराष्ट्राच्या राजकारणात २१ वर्ष विविध खात्याचे मंत्री व ५ वर्ष महाराष्ट्र राज्य विधानसभा अध्यक्ष म्हणून काम करतांना मधुकरराव चौधरी यांनी आपल्या सत्तेचा केंद्रबिंदू हा उपेक्षित घटक ठेवुन त्यासाठी अंत्योदय हाच कार्याचा मुलाधार ठरवुन महाराष्ट्रभर कार्य केले.

महाराष्ट्राच्या राजकारणात जळगांव जिल्ह्याचे नेतृत्व करतांना आदिवासी सेवेचे कार्य, आदिवासी शिक्षणाची व्यवस्था, खान्देश कुष्ठसेवा मंडळ, सामाजिक कल्याणाच्या दृष्टीने विविध शैक्षणीक संस्थाची निर्मीती इ. प्रकारचे कार्य करुन जनसामान्यांच्या मनात मधुकरराव चौधरी यांनी उपेक्षितांचा खरा कैवारी ही प्रतिमा निर्माण केली. म्हणूनच आज जळगांव जिल्ह्याचे भाग्यविधाता म्हणून चौधरी यांना ओळखले जाते.

सामाजिक विकासाच्या परिघात येणारा कोणताही घटक ज्याप्रमाणे शिक्षक,विद्यार्थी, शेतकरी, कामगार, महिला, बालक, शेतमजुर या सर्वच घटकांसाठी मधुकरराव चौधरी यांनी विकासाचे कार्य केल्याचे दिसुन येते. जळगांव जिल्ह्यासाठी मधुकरराव चौधरी यांनी दिलेले योगदान आजही जनता विसरत नाही यातून मधुकरराव चौधरी हे स्मरणशील असे व्यक्तीमत्व होते असेच म्हणावे लागेल.

७. **शिक्षणातील सामाजिक दृष्टीकोन –** महात्मा फुले, राजर्षी शाहु महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षण हा मानवी समाजाच्या विकासाचा केंद्रबिंदु आहे असे मानुन शिक्षणापासुन कोणीही वंचीत राहणार नाही याची जाणीव पुर्वक काळजी घेण्याचा प्रयत्न करुनं त्या दृष्टीने महत्वपूर्ण कार्य ही केलेले आहे. याप्रमाणेच महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळात शिक्षणमंत्री म्हणून मधुकरराव चौधरी यांनी काम करतांना शिक्षण विषयक श्वेतपत्रिका काढून शिक्षण क्षेत्रात मोलाचे कार्य केले व समाजाच्या कल्याणात शिक्षक, शिक्षण व विद्यार्थी यांचा मोलाचा वाटा आहे हे ठणकावून सांगितले व शिक्षण विषयक नवा सामाजिक दृष्टीकोन निर्माण केला म्हणून त्यांना उत्कृष्ट शिक्षणमंत्री,शिक्षकमित्र शिक्षणमंत्री म्हणून ओळखले जाते. या कार्याबाबत त्यांचा शिक्षणरत्न पुरस्कार देउन गौरवही करण्यात आला आहे. यातच मधुकरराव चौधरी यांचा सामाजिक कल्याणाचा दृष्टीकोन दिसून येतो.

**निष्कर्ष**

मधुकरराव चौधरी यांच्या सामाजिक कल्याणाच्या विचाराची आज खऱ्या अर्थाने गरज असल्याचे दिसते. कारण स्वातंत्र्य मिळवुन ६८ वर्ष झाले असतांना सुद्धा आजही सामाजिक पातळीवर विकासाचा समतोल साधला गेल्याचे दिसत नाही. दारिद्र्याचे प्रमाण, बेरोजगारीचे प्रमाण वाढतांना दिसत आहे. त्या बरोबरच आज फुले,शाहु,आंबेडकर यांना अपेक्षीत असणारा खरा समाज निर्माण व्हावयाचा असेल तर सामाजिक, राजकीय पातळीवर फुले, शाहु, आंबेडकरांच्या विचारांच्या कृतीच्या दृष्टीने कार्य करण्याची गरज आहे असे वाटते.

अन्यथा स्वातंत्र्य मिळवुन सुध्दा काहीच उपयोग नाही. अशीच भूमिका येणाऱ्या काळात सामाजिक पटलावर व्यक्त होऊन सामाजिक विषमतेची दरी वाढल्याशिवाय राहणार नाही. म्हणून मधुकरराव चौधरी व महात्मा फुले, राजर्षी शाहु महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा समतावादी दृष्टीकोन हा येणाऱ्या काळासाठी आवश्यक असल्याचे दिसते.




Scanned with CamScanner

संदर्भग्रंथ

१. चौधरी प्रभात, लोकसेवक बाळासाहेब मधुकरराव चौधरी, प्रकाशक-लोकसेवक मधुकरराव चौधरी गौरव समिती,मुंबई, प्रथम आवृत्ती १६ जून २००७
२. प्राचार्य डॉ.सर्जेराव भामरे, संशोधक - इतिहासाचार्य वि.का.राजवाडे संशोधन मंडळ,धुळे, सप्टेंबर २०१० अंक ०३
३. भालेराव अ.फ., लोकहितैषी - बाळासाहेब मधुकरराव चौधरी, अंकुर प्रकाशन-अकोला प्रथम आवृत्ती ८ जूलै २०११
४. प्रा.भानू चौधरी, वचनपूर्ती मा.बाळासाहेब मधुकरराव चौधरी, प्रकाशक-श्री बाळकृष्ण सिताराम चौधरी,रावेर, नोव्हेंबर १९९४
५. चौधरी शिरीष, गौरवांजली - लोकसेवक बाळासाहेब मधुकरराव चौधरी, गौरवग्रंथ,मुंबई प्रथम आवृत्ती १६ जून २००७
६. डॉ.अशोक कामत, ना.मधुकरराव चौधरी शैक्षणिक जीवन कथा, प्रकाशन, गुर्किुल प्रतिष्ठाण,पुणे, प्रथम आवृत्ती [illegible]
७. महाराष्ट्र विधानसभा कार्यवाही (शासकीय प्रतिवेदन), [illegible] पृ.क्र. १२८९
८. राम प्रधान, यशवंतरापव चव्हाण शब्दांचे सामार्थ्य, [illegible] पुणे, नोव्हेंबर २०००
९. डॉ.के.पी.राणे, शिक्षणतज्ञ मधुकरराव चौधरी, [illegible] प्रकाशन,पुणे, प्रथम आवृत्ती १६ जून २००९
१०. मधुकरराव चौधरी, महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेच्या [illegible] भाषण, प्रकाशक- संचालक बालशिक्षण संशोधन [illegible] परिषद,पुणे, १३ नोव्हेंबर २००३
११. मुलाखत, मधुकरराव चौधरी
१२. डॉ.जयसिंगराव पवार, राजर्षी शाहु छत्रपती जीवन व कार्य, [illegible] इतिहास प्रबोधीनी,कोल्हापुर, प्रथम आवृत्ती १ नोव्हें. [illegible]

Scanned with CamScanner

**• महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेची संशोधन पत्रिका •**




**अथर्व पब्लिकेशन्स्**

ISSN 2347-9639
9 772347 963003

**Visit us... www.atharvapublications.com**

Scanned with CamScanner